दिनांक २३/०२/२०२१

**प्रसिध्दी पत्रक**

**आरोपी लोकसेवक प्रशांत संतोष राठोड, पद- तंत्रज्ञ, कार्यालय सहायक अभियंता, MSEDCL, शाखा -हर्सुल (शहर) औरंगाबाद यांनी १०००/- रु लाचेची स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद च्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव, हुद्दा | :- | प्रशांत संतोष राठोड, वय २५ वर्ष, पद- तंत्रज्ञ, कार्यालय सहायक अभियंता, MSEDCL, शाखा- हर्सुल (शहर) औरंगाबाद. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे हर्सुल, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. उन्मेष थिटे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | १,०००/- रु स्विकृती |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे ग्राहकाचे सोलार सिस्टीमचे नेट मीटरला टॅग करुन त्याचे फोटो व SVR महावितरण कार्यालयात सादर करण्यासाठी |
| लाच मागणी ठिकाण | :- | तक्रारदार यांचे ग्राहकाचे घरातील पार्किग मध्ये ऑडीटर सोसायटी, मयुर पार्क, औरंगाबाद |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार हे सोलार पॅनल बसविण्याचे कामकाज करतात. त्यांनी त्यांचे ग्राहकाचे घरावर सोलार सिस्टीमचे पॅनल बसविले आहे. त्याव्दारे तयार झालेली वीज एमएसईडीसीएल ला पुरविण्याचे नियोजन आहे. या साठी बसविण्यात आलेल्या नेट मीटरला टॅग करुन त्याचे फोटो व SVR महावितरण कार्यालयात सादर करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे प्रशांत राठोड, तंत्रज्ञ, MSEDCL कार्यालय, शाखा -हर्सुल औरंगाबाद हे १,०००/- रु लाचेची मागणी करित असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, प्रशांत संतोष राठोड, तंत्रज्ञ, MSEDCL कार्यालय, शाखा -हर्सुल औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे १,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, प्रशांत संतोष राठोड, तंज्ञत्र, MSEDCL कार्यालय, शाखा- हर्सुल औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन १०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे हर्सुल, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. उन्मेष थिटे यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार संतोष जोशी, दिगंबर पाठक, मिलींद इपर, चालक अंमलदार देवसिंग ठाकुर यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-**1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

पोलीस उप अधीक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.